# बातमीपत्र
## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर
## माहिती कक्ष, दि. २० सप्टेंबर २०२२

### एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५२७/२०२२ भादंविसक ५०४,५०६, अनु.जाती व अनु.जमाती (अत्याचार प्रति) अधिनियम सुधारणा २०१५ चे कलम ३(i)(r)(s),(३)(२)(va) प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ११/०९/२०२२ रोजी १९.३० वा ते २०.०० वा चे सुमारास, खमितकर प्रशालेजळ, बाळशिवयोगी नगर, पारशी विहीर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २०/०९/२०२२ रोजी १४.२१ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | अजय सुर्यभान प्रक्षाळे, वय- ४५ वर्षे, रा. गोंदुताई परुळेकर नविन विडी घरकुल, घर नं. ७०/४ब, १३ नंबर हॉल शेजारी, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) अभिजीत भारत मनसावाले, २) सुमित भारत मनसावाले, ३) शुभम भारत मनसावाले, सर्व रा. खमितकर प्रशालेजळ, बाळशिवयोगी नगर, पारशी विहीर, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, यातील फिर्यादीचे मित्र भारत मनसावाले हे व त्यांची मुले वरील आरोपीत हे फिर्यादीस मागील ७ ते८ वर्षापासुन ओळखतात. भारत यांचे कडे पाच सहा फोर व्हिलर व टुव्हिलर असल्याने फिर्यादीने मित्रत्वाच्या नात्याने साधारण एक वर्षापुर्वी एखादी गाडी वापरायला दया म्हणाले होते. त्यावेळी त्यांनी एक वर्षापासुन बंद असलेली टिव्हीएस ज्युपीटर लाल रंगाची एम एच १३ बी ई १७३४ ही वापरण्यासाठी दिली. त्यावेळी गाडीचे किती पैसे दयायचे याबाबत बोलणी झाली नव्हती. त्यानंतर फिर्यादीने गाडीस थोडे थोडे करुन १५ हजार रुपये खर्च केले होते. व ती गाडी फिर्यादी वापरत होते. त्यानंतर फिर्यादीने सहा महिने नंतर गाडीचे ५०००/- रु भारत यांना दिले होते. परत भारत यांनी फिर्यादीस गाडीचे आणखी पैसे दे असे म्हणून फिर्यादीस तगादा लावला. त्यावेळी फिर्यादीने भारत मनसावाले याचा नंबर ब्लॅकलिस्ट मध्ये टाकला त्यानंतर फिर्यादीस आरोपीत क्रं. १ याचे मोबाईल नंबरवरुन फोन येऊ लागले. वरील वेळी भारत मनसावाले याचे नंबरवरुन फिर्यादीस व्हाईस रेकॉर्डींग पाठविले व ते लगेच डिलीट केले. त्यानंतर फिर्यादी हे वरील वेळी व ठिकाणी गेले असता आरोपीत क्रं. १ यास मालक कोठे आहेत असे विचारले असता, वरील आरोपीत क्रं. १ याने फिर्यादीस तुला मग अजुन कुठल्या भाषेत बोलावं, तुला का भारी वाटालंय का, आमची गाडी घेवून जातो आणि फोन उचलीना, तुला कुठल्या भाषेत बोलायचं असे म्हणून मोठमोठयाने बोलायला लागला. त्यावेळी आरोपीत क्रं. २ व ३ हे आले आणि फिर्यादीच्या अंगावर येवू लागले. त्यावेळी वरील आरोपीतांनी फिर्यादीस काय रे भांडण करायला आलाव का, जा नायतर दुसरापण पाय काढीन असे म्हणून जातीवाचक शिवीगाळ करुन दमदाटी केली आहे म्हणून. तपास:- सपोआ विभाग-१ संतोष गायकवाड- **८३०८१९५९३३** |